THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 19TH JULY 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे, मुंबई, तारीख २१माहे जून सन १८९४

नंबर ५२९६.—सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थां विषयींचा आक्ट ह्याच्या ७ व्या कलमाअन्वयें ज्या कानू करण्याचें योजिलेलें आहे, त्या कानूंबद्दलच्या जाहिरनाम्याचा मसुदा, त्या कानूंशीं ज्या लोकांचा संबंध येण्याचा संभव आहे त्यांच्या माहितीसाठीं, ह्याखालीं प्रसिद्ध केला आहे.

ह्यावरून असें फर्मीविण्यांत येत आहे कीं, सदहू मसुद्याचा विचार ह्या जाहिरनाम्याच्या तारखेनंतर एक महिना पुरा झाल्यावर करण्यांत येईल, आणि त्याप्रसंगीं, त्या मसुद्याच्यासंबंधानें सदहू मुदतीच्याआंत ज्या कांहीं हरकती अगर सूचना रुजू करण्यांत येतील त्यांचाही विचार होईलः—

सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ह्याच्या ७ व्या कलमामध्यें दिलेले अधिकार चालवून आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून, आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल ह्यांनीं, सन १८८७ चें मुंबई सरकारी गाझेट, भाग १, ह्याच्या ९९९ व्या पृष्ठावर प्रसिद्ध करण्यांत आलेला जाहिरनामा नंबर ४११६ ह्यांतील कानूंपैकीं कानू नंबर २७ हिच्या ऐवजीं खालील कानू केली आहेः—

ह्यानंतर सांगितलेल्या अमलदारांस, ह्याखालीं अनुक्रमें निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांमध्यें खालील अधिकार चालविण्याचा अखत्यार दिलेला आहे : ते अधिकार येणेंप्रमाणें :—

(अ) ज्या कोणत्याही जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवामध्यें, सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ह्याअन्वयें दिलेल्या लैसेन्साबरहुकुम कोणताही बारीपदार्थ तयार करण्यांत येत असेल, कबजांत ठेवलेला असेल, वापरण्यांत येत असेल, विकण्यांत येत असेल, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असेल, अगर बाहेरील प्रदेशांतून आणण्यांत येत असेल, अगर ज्या जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवामध्यें सदहू आक्टाविरुद्ध किंवा सदहू आक्टाअन्वयें केलेल्या कानूंविरुद्ध कोणताही बारीपदार्थ तयार करण्यांत आला आहे अगर येत आहे, कबजांत ठेविलेला आहे अगर ठेवण्यांत येत आहे, वापरण्यांत आला आहे अगर येत आहे, विकण्यांत आला आहे अगर

येत आहे, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत आला आहे अगर येत आहे अगर बाहेरील प्रदेशांतून आणण्यांत आला आहे अगर येत आहे असें वाटण्यास सदहू अमलदारांस कारण असेल त्या जागेंत, गाडींत अगर तारवांत शिरून त्याची पाहाणी अगर तपासणी करण्याचा अखत्यार आहे;

(ब) त्यांत बारीपदार्थ शोधण्याचा अखत्यार आहे;

(क) त्यांत सांपडलेल्या कोणत्याही बारीपदार्थाचे नमुने, त्यांची किंमत देऊन घेण्याचा अखत्यार आहे.

(ड) त्यांत सांपडलेल्या ज्या कोणत्याही बारी पदार्थासंबंधानें सदहू आक्टाच्या अगर सदहू आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांचा भंग झालेला आहे असें वाटण्यास कारण असेल तेव्हां तो पदार्थ आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें धरण्याचा, अटकावून ठेवण्याचा, काढून नेण्याचा, आणि, सार्वजनिक सलामतीस अवश्यक असल्यास, त्याचा नाश करण्याचा अखत्यार आहे.

**स्थलमर्यादा.**

| | |
|---|---|
| इलाख्याच्या सर्व भागांत ... ... ... | खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट. |
| | खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे असिस्टंट सुपरिंटेंडंट. |
| आपापल्या जिल्ह्यांत ... ... ... | सर्व जिल्हा माजिस्ट्रेट. |
| आपापल्या हुकुमतीखालील प्रदेशांत ... ... | जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील सर्व माजिस्ट्रेट. |
| मुंबई शहर व बेट ह्यांत ... ... ... | कमिशनर आफ् पोलीस, इन्स्पेक्टरच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाहीं अशा ज्या कोणत्याही पोलीस अमलदाराला कमिशनर आफ् पोलीस ह्यासंबंधानें मुद्दाम पाठवितील, तो पोलीस अमलदार. |

आलीजा गव्हर्नर साहेब बाहादुर
इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जी. डब्ल्यू. व्हायडल,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.